LG SAMSUNG
सवति स्वस्त
सवति मोठी रेंज सर्वोत्तम सर्विस
चिठोरे यांचे Since 1965
मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
रुक्मिणी नगर, अमरावती
8600050015

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव १९५०-२०२४

अत्याधुनिक फर्निचर व गिफ्ट आर्टिकल्स चे सर्वांग सुंदर दालन
Nilkamal श्री अम्बीयन्स BAJAJ FINSERV
फर्निचर अॅन्ड इंटेरियर मॉल
सोमवार बंद
■ सोफा सेट ■ डायनिंग टेबल ■ बेडरुम सेट ■ ऑफिस फर्निचर ■ स्टिल अलमारी ■ टि टेबल, मंदिर ■ गिफ्ट आर्टिकल्स
एकनाथपुरम, शंकर नगर, अमरावती Ph.0721-2677002

■ वर्ष ७५ वे/अंक १६७ वा ■ ■ अमरावती, मंगळवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २१ माघ १९४६ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

CP PLUS सुरक्षित बनायें-अपना घर, व्यापार
PRAMA Prakash Vision HIKVISION alhua
आता कॅमेरे बसवण झाले एकदम स्वस्त
* फ्रि इंस्टॉलेशन *
BOOKINGS OPEN !
YOUR SECURITY IS OUR PRIORITY
M : 8600954779 / 7756999604 / 8184057777
सागर प्लास्टिक
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
100% होलसेल भावात
इस से सस्ता और अच्छा कही नही

# सर्व सरकारी कार्यालयात मराठी बोलणे अनिवार्य



मुंबई दि. ३ : मराठी भाषा संवर्धनासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता महाराष्ट्रातील सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य करण्यात आले आहे. मराठा भाषा बोलणे आणि मराठी व्यवहार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्य सरकारने मोठे पाऊल उचलावे लागते. शासकीय कार्यालयात सर्वत्र मराठी फलक असणार आहेत. तसेच मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

मराठी भाषेला अलिकडेच केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठी भाषेचे महत्व टीकविण्यासाठी मराठी बोलणे आणि मराठीत व्यवहार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आता राज्य सरकारने मराठी भाषेचे संवधर्न करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेतला आहे. आता महाराष्ट्राच्या सर्व शासकीय, निमशासकीय आणि महापालिका कार्यालयात मराठी बोलणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. आता सरकारी कार्यालयात दर्शनी भागात मराठी भाषेत बोलण्याबद्दल (पान २ वर)

# एकनाथ शिंदेंची पुन्हा फडणवीसांच्या बैठकीला दांडी



मुंबई दि. ३ : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आपल्या नेतृत्वात दैदिप्यमान यश प्राप्त झालेले असतानाही आपल्याला मुख्यमंत्री पदावर कायम ठेवले नाही याची नाराजी एकनाथ शिंदे यांच्या वागण्यातून वेळोवेळी दिसून येत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकांना गैरहजेरी लावणाऱ्या उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलावलेल्या बैठकीलाही दांडी मारल्याने शिंदे नाराजच असल्याच्या चर्चांना पुन्हा सुरुवात झाली आहे.

एवढेच नाही तर शिंदे यांच्या खात्याने बोलविलेली नगर विकास आणि पाणीपुरवठा विभागाची बैठकही रद्द करण्यात आली होती. शिंदेंचे सरकार असताना फडणवीस शिंदेंच्या सावलीप्रमाणे त्यांच्या सोबत असायचे. परंतू , आता शिंदे मात्र फडणवीसांच्या सोबत वारंवार दिसत नाहीत. उलट अजित पवार आणि त्यांचे मंत्री मात्र या बैठकांना उपस्थित राहत आहेत. यामागे नेमके काय गौडबंगाल आहे यावर आता चर्चा झडू लागल्या आहेत.


फडणवीसांच्या बैठकीला अजित पवार व त्यांचे मंत्री उपस्थित होते. सोशल वॉर रुमबाबत ही बैठक बोलविण्यात आली होती. सरकारविरोधी दावे, प्रतिदावे तसेच सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन यात करण्यासाठी ही बैठक होती. या बैठकीला शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून उपस्थित (पान २ वर)

# दिल्लीतील प्रचाराच्या तोफा थंडावल्या, ५ फेब्रुवारीला मतदान

नवी दिल्ली दि. ३ : दिल्ली विधानसभा निवडणुकीचा प्रचार सोमवारी (३ फेब्रुवारी) सायंकाळी ६ वाजता थांबला. ५ फेब्रुवारीला मतदान होईल आणि ८ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होतील. निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या दिवशी राजकीय पक्षांच्या काही मोठ्या नेत्यांनी जनतेशी संपर्क साधला. ५ फेब्रुवारीला दिल्लीतील १.५६ कोटी मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील.

तत्पूर्वी, निवडणूक आयोगाने ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६:३० वाजेपर्यंत एक्झिट पोलवर निर्बंध घातले आहेत. या संदर्भात, दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एक आदेश देखील जारी केला आहे. निवडणूक आयोगाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, जनसामान्य प्रामुख्याने वृत्तसंस्था, मीडिया हाऊसेस, रेडिओ आणि टेलिव्हिजन चॅनेल इत्यादींचे लक्ष भारत निर्वाचन आयोगाच्या अधिसूचना क्रमांक ५७६/एक्झिट /२०२५/एसडीआर/भाग-१ दिनांक २२ जानेवारी २०२५ कडे आकर्षित केले जाते आहे की, प्रिंट अथवा इलेक्ट्रॉनिक (पान २ वर)

# महाकुंभाचे शेवटचे अमृत स्नान:१.६३ कोटी लोकांनी केले स्नान



प्रयागराज दि. ३ : वसंत पंचमीला महाकुंभातील तिसरे आणि शेवटचे अमृत स्नान सुरू आहे. हातात तलवार-गदा, डमरू आणि शंख. अंगावर राख. डोळ्यावर काळा चष्मा. घोडा आणि रथाची सवारी. हर हर महादेवचा जयजयकार करत, संत आणि ऋषी स्नानासाठी संगमावर पोहोचत आहेत.

सर्वप्रथम, पंचायती निरंजनी आखाड्याचे संत संगमात पोहोचले. त्यानंतर किन्नर आखाड्याने सर्वात मोठ्या जुना आखाड्यासह अमृत स्नान केले. आतापर्यंत, १३ पैकी १० आखाड्यांनी स्नान केले आहे.

संतांचे आशीर्वाद घेण्यासाठी लाखो भाविक संगम येथे येतात. लोक नागा साधूंच्या पायाची धूळ त्यांच्या कपाळावर लावत आहेत. अमृत स्नान पाहण्यासाठी २० हून अधिक देशांतील लोक संगमला पोहोचले आहेत. हेलिकॉप्टरमधून संगमवर २० क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला.

संगमाकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर १० किमीपर्यंत भाविकांची मिरवणूक आहे. प्रयागराज जंक्शनपासून ८ ते १० किमी चालत लोक संगमला पोहोचतात. गर्दी पाहून हनुमान मंदिर बंद करण्यात आले. जत्रा परिसरातील सर्व रस्ते एकेरी आहेत.

# राज्यात १ लाख ९४ हजार एसईओ ची नियुक्ती

मुंबई दि. ३ : महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील समिती या नियुक्ती प्रक्रिया पाहणार आहे. समितीमध्ये संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी सदस्य असतील. राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या या नियमावलीत पात्रता निकष, जबाबदाऱ्या आणि निवड प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली आहे. विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती पाच वर्षांसाठी करण्यात येईल. तसेच, (उर्वरित पान २ वर)


# लाडक्या बहिणींना येत्या अर्थसंकल्पानंतर २१०० रु. मिळणार



मुंबई दि. ३ : ज्या कुटुंबाचं आर्थिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं गेल्या वर्षी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यामध्ये दर महिन्याला दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. जुलैपासून ते जानेवारीपर्यंत एकूण सात हाप्ते या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत. या योजनेला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार येण्यामध्ये देखील या योजनेचा मोठा वाटा असल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान आमचं सरकार आलं तर आम्ही महिलांच्या खात्यामध्ये दर महिन्याला २१०० रुपये जमा करू अशी घोषणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीकडून करण्यात आली होती. आता राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं आहे. त्यामुळे (उर्वरित पान २ वर)

# टोल स्वस्त होणार? : नितीन गडकरी



मुंबई दि. ३ : वाहनधारकांना सध्या मोठ्या प्रमाणात टोल भरावा लागत आहे. याबाबत अनेकांनी तक्रारी केल्या आहेत. तर अनेक ठिकाणी आंदोलनेही झाले आहेत. आता वाहनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याबाबत एक मोठी अपडेट दिली आहे. रस्ते वाहतूक मंत्रालय एकसमान टोल धोरणावर काम करत आहे. आता भारतातील महामार्ग पायाभूत सुविधा अमेरिकेशी जुळतात, असंही गडकरी यांनी सांगितले.

'राष्ट्रीय महामार्गावरील जास्त टोल शुल्क आणि खराब रस्त्यांमुळे लोकांमध्ये असंतोष आहे, असा प्रश्न केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना एका मुलाखतीमध्ये विचारण्यात (पान २ वर)

# राज्यातील कंत्राटदारांचा काम बंद आंदोलनाचा इशारा, सरकारने ८९ हजार कोटी थकवल्याचा आरोप

मुंबई दि. ३ : राज्यातील शासकीय विकासकामं करणाऱ्या कंत्राटदारांनी पुन्हा एकदा काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. शासकीय कामांची जवळपास ८९ हजार कोटी रुपयांची थकबाकी असल्याचं कंत्राटदार संघटनांनी म्हटलं आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारी पासून काम बंद आंदोलन करत असल्याच्या इशारा या संघटनानी दिला. राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ या दोनही संघटनांची मंगळवारी या संदर्भात बैठक होणार आहे.

राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या. त्यामुळे या निवडणूक काळात योजनांचा आणि विकास कामांचा पाऊस पाडला गेला. प्रत्येक आमदाराला खुश करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला. विकास कामंही सुरु झाली. मात्र आता निधी वितरीत होत नसल्याने कंत्राटदार हैराण झालेत. या विकास कामांचा जवळपास ८९ हजार कोटी रुपयांची थकबाकी वाढलीय. त्यामुळे ५ फेब्रुवारी पासून काम बंद आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

राज्यात लाडकी बहीण योजनेमुळे तिजोरीत खडखडाट आहे. त्यामुळे हा निधी मिळत नसल्याचं बोललं जात आहे. त्यामुळे विरोधकांनीही मोठ्या प्रमाणावर सरकारवर टीका केली आहे.

मतदारसंघात विकास काम आणण्यासाठी (पान २ वर)

# किती जणांचा मृत्यू झाला? नेमकं सत्य काय?, कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेवरून मल्लिकार्जुन खरगे आक्रमक



नवी दिल्ली दि. ३ : अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज (दि.३ फेब्रुवारी) दुसरा दिवस आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये महाकुंभमेळ्यात घडलेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून आरोप-प्रत्यारोप झाले. राज्यसभेच्या सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यानंतरच विरोधी पक्षाच्या खासदारांनी प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीचा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेबाबत सभागृहात चर्चेची मागणी करण्यात आली होती. मात्र, विरोधी खासदारांची ही मागणी मान्य न केल्यामुळे खासदारांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केल्याचंही पाहायला मिळालं.

दरम्यान, यानंतर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देखील सभागृहात बोलताना विविध मुद्यांवरून चांगलेच आक्रमक (पान २ वर)

# लाखांचे बक्षीस असलेल्या जहाल माओवाद्यासह चौघे पोलिसांना शरण

गडचिरोली दि. ३ : तब्बल २८ लाख रुपये बक्षीस असलेल्या एक वरिष्ठ कॅडरच्या नक्षलसह एक एरिया कमिटी मेंबर आणि दोन सदस्यांनी गडचिरोली पोलीस आणि सीआरपीएफ दलासमोर आत्मसमर्पण केलंय. अशोक सडमेक उर्फ चंद्रशेखर, वनिता झोरे, साधू मोहंदा आणि मुन्नी कोरसा असे आत्मसर्पण केलेल्या नक्षलवाद्यांची नावे आहेत. अशोक हा नक्षल चळवळीतील वरिष्ठ नेता असून वनिता टेक्निकल टीमची सदस्य तर साधू आणि मुन्नी ह्या सदस्य आहेत. अशोक वर ८२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ३१ चकमक १७ जाळपोळ आणि ३४ इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्यावर शासनाने १६ लाखांचे बक्षीस ठेवले होते. तर वनिता हिच्यावर ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये एक चकमक, दोन जाळपोळ ८ इतर गुन्ह्यांचा समावेश आहे. (उर्वरित पान २ वर)

# महाकुंभ मेळ्यातील चेंगराचेंगरीची दुर्घटना दुर्दैवी : सुप्रीम कोर्ट



नवी दिल्ली दि. ३ : महाकुंभमेळ्यात घडलेल्या चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी आहे, असं सांगतानाच या घटनेत हस्तक्षेप करण्याची मागणी करणाऱ्या याचिकाकर्त्याला उच्च न्यायालयात यासंबंधी याचिका दाखल करावी, असा सल्ला सुप्रीम कोर्टानं दिला. ही एक दुर्दैवी घटना आहे आणि नक्कीच चिंतेची बाब आहे. पण तुम्ही उच्च न्यायालयात जा. आधीच एक न्यायालयीन आयोग स्थापन करण्यात आला आहे, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या अध्यक्षतेखाली दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले.

उत्तर प्रदेश सरकारची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की, या घटनेच्या चौकशीसाठी न्यायिक आयोग स्थापन करण्यात आले असून, याच प्रकारची एक याचिका उच्च न्यायालयातही दाखल करण्यात आली आहे.

महाकुंभ मेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीच्या (पान २ वर)

# दिल्लीत आपला ५५ जागा मिळतील : केजरीवाल



नवी दिल्ली दि. ३ : दिल्लीत प्रचाराच्या तोफा आता थंडावल्या आहेत. जुन्या प्रचाराप्रमाणे आता कंदील प्रचार सुरु होणार आहे. दिल्ली निवडणुकीत लोकांचा कल कोणाकडे आहे, याबाबतचा सीव्होटरचा अंदाज समोर आला आहे. यात फारसा फरक दिसत नाहीय. असे असताना भाजपा दिल्लीतील सत्ता काबीज करण्यासाठी उत्सुक आहे, तर आपला किल्ला टिकवायचा आहे. आपचे निम्मे आमदार पक्ष सोडून पळाल्याचा दावा भाजपा करत आहे, (पान २ वर)

## माहोल....




सरकारचे काय बजेट वाचत बसता, इन्कम वाढविण्याचा कुठला तरी मार्ग बघा...माझे घरचे बजेट बिघडले आहे!!

AC SPECIALIST SHOWROOM
सवति मोठी रेंज
58 वर्षांची सेवा
घा फक्त ₹1111/-* व घेऊन जा नामांकित AC
चिठोरे यांचा मॉडर्न इलेक्ट्रॉनिक मॉल
रुक्मिणी नगर अमरावती 8600050015

एअर कंडीशनर्स
सभी ब्रांड्स एक छतके निचे
UPTO 40% OFF
अधिकृत विक्रेता केडिया ट्रेडर्स
C/o केडिया मॉल, इफरीन रोड, श्रीकृष्णपेठ, अम. मो. 9049912413

संपूर्ण लग्न बस्ता
आराधना
होलसेल शॉपिंग मॉल
आराधना लाडली बहना उपहार योजना
खरीदारी करें और भाग्यशाली बनें
डेली ड्रॉ । मंथली ड्रॉ । मेगा ड्रॉ
प्रत्येक 1000/- रु की खरीदी पर पाईए एक लकी कूपन
हर रोज होने वाले ड्रॉ मे 10 लाडली बहनों को मिलेगी
2100/- रु. की साडी फ्री
हर महिने सभी कूपन का बम्पर लकी ड्रॉ होगा। उसमें 10 विजेता लकी लाडली बहनो को मिलेंगे बम्पर 10 उपहार
फॅशन । ज्वेलरी । चिल्ड्रेन्स वेअर । शूज व सॅंडल । होम डेकोर । मॅचिंग
बनारसी शालू - डिझायनर साड्या - घागरा ओढनी - सलवार सुट - ड्रेस मटेरियल - रेडीमेड कोट - सुटिंग-शर्टिंग - जेन्ट्स वेअर - किड्स वेअर
जवाहर रोड, अमरावती. © 2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

जे.के.फर्निशींग
सोफा कापड ● फोम गादी ● सोफा गादी ● कुशन ● लोड
पि.व्ही.सी कार्पेट ● पडदे
Sleepwell
जयस्तंभ चौक, अमरावती. मो. ९८९५०९३३४, ९१४६०९११९६